**विस्तार अधिकारी (शिक्षण) संवर्गातील कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व नेमणूका सन 2025**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण प्राथमिक विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या-1/पीई-3/पदो/149/2025
अहिल्यानगर दि16/05/2025

वाचा — 1.महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.-112/आस्था-14,दि.15/05/2014
2.ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-4816/प्र.क्र.136/आस्था-14, दि.02/01/2017
3.महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन पुरक पत्र क्र.जिपब-4817/प्र.क्र.-228/आस्था-14,दि.07/03/2019
4.ग्रामविकास विभागाकडील शासन पुरकपत्र क्र.जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14, दि.28/03/2025
5. मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)जि.प.अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-3/1222/3312025,दि.26/03/2025
6. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-3/443/25,दि.08/05/2025
7. सर्वसाधारण बदली इतिवृत्त दि.13/05/2025

मा.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.15 मे 2014 चे शासननिर्णय व संदर्भ क्र.2,3,4 मधील शासन शुध्दीपत्रक व शासन पुरक पत्रातील तरतुदींनुसार जिल्हा परिषद शिक्षण (प्राथमिक)विभागाच्या अधिनस्त असलेल्या विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावापुढील रकाना क्र.03 येथे नमुद केलेल्या ठिकाणावरुन रकाना क्र.04 मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी विनंती बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव | सध्याचे कार्यरत बीट व तालुका | समुपदेशनाने पदस्थापना दिलेले बीट व तालुका | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | श्री झावरे संभाजी मल्हारी | खिरविरे,ता.अकोले | शेंडी,ता.अकोले | अदिवासी क्षेत्रातर्गत विनंती बदली |
| 2 | श्री.भांगरे एकनाथ यशवंत | धांदरफळ ता.संगमनेर | खिरविरे ता.अकोले | बिगर अदिवासी क्षेत्रातुन अदिवासी क्षेत्रात विनंती बदली |

वरील कर्मचा-यास बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाचे दिनांकापासून कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.उपरोक्त संदर्भ क्र.1 मधील प्रकरण 1 मुद्दा क्र.7 नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाचे दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा केले जाणार नाही बदलीनंतर संबंधित बदलीचे ठिकाणी रुजू न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल.तसेच अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन म्हणून गणला जाईल.

तसेच मुद्दा क्र.08 मध्ये नमूद केलेप्रमाणे बदली ही संपूर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 6 (5) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.सदर बदली विनंती कारणास्तव झाली असल्याने संबंधितांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक 202505161600043 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

1. श्री झावरे संभाजी मल्हारी,विस्तार अधिकारी,पंचायत समिती अकोले
2. श्री.भांगरे एकनाथ यशवंत विस्तार अधिकारी शिक्षण पंचायत समिती संगमनेर

व्दारा व प्रत – गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती अकोले/संगमनेर

2/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधितांचे वेतन आदेशाचे दिनांकानंतर अदा करु नये,तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत – मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत- गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती अकोले/संगमनेर

स्वाक्षरित/-
(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर